पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ८८**
(सभावृत्तांत)

**दिनांक – ०५/११/२०१८** **वेळ – दुपारी १२.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा सोमवार, दिनांक ०५/११/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.राजू मिसाळ
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी
१४. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.पाटील - अतिरिक्त आयुक्त(१), मा.गावडे – प्र.अतिरिक्त आयुक्त(२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.निकम, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर - सहाय्यक आयुक्त, मा.राऊत, मा.दांगट,– प्र. सहाय्यक आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.तांबे, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.गलबले,

मा.घोडे, मा.कांबळे, मा.औंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.सुपेकर, मा.देशमुख, मा.सेठीया, मा.फुटाणे - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी, पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.३८) मानधन तत्वावर नेमणूक करणेबाबत. – मा.सागर आंगोळकर मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३९) अदिवासी खाद्य महोत्सवाचे आयोजन करणेबाबत. - मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

विषय क्र.४०) मा.स्थायी समिती ठराव क्र.३४४६, दि.३०/१०/२०१८ मध्ये दुरूस्तीबाबत – मा.सागर आंगोळकर, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव

विषय क्र.४१) नि.नो.क्र.३/२०१८-१९ मनपाचे ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील सार्वजनिक शौचालयाचे व मुता-यांची यांत्रिक पध्दतीने व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व देखभाल दूरूस्ती करणेबाबत.

विषय क्र.४२) महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत. – मा.विकास डोळस, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४३) प्रभाग क्र.२६ येथील महादेव मंदिर ते बाणेर पूल तसेच त्याला लागुन पिंपळेनिलख स्मशान भूमी पर्यंतचा १८ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणेकरीता विद्युत विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.४४) अनाधिकृत जाहिरात फलक काढणेकामी वाढीव खर्चास मंजुरी मिळणेबाबत.

विषय क्र.४५) सन २०१६-१७ साठी जलक्षेत्र क्र.बी/२ ते बी/८ मध्ये व्हॉल्व ऑपरेशन करणेबाबत.

विषय क्र.४६) फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत औष्णिक धुरीकरण करण्यासाठी झेन फॉग व व्हॅन फॉग मशिन ठेवून कामकाज करण्यासाठी आवश्यक डिझेल इंधनावर चालणारे (दोन) रिक्षा टेम्पो भड्याने वाहनचालकासह घेणेबाबत.

विषय क्र.४७) पिंपरी महानगरपालिका हद्दीबाहेर आसलेल्या निरगुडी ग्रामपंचायत गावात १०.००० लिटर्स क्षमतेचे टँकर दररोज देणेबाबत.

----------

दिनांक ३०/१०/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ८७)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ३५६२ विषय क्रमांक - १
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – क्रीडा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव –

विषय - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.५३ दि.१२/१०/२०१८ बाबत.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५६३ विषय क्रमांक - ०२
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/४४३/२०१८ दि.१९/१०/२०१८

विषय - सन २०१८-१९ करीता प्रभाग क्र.१७ मधील मनपा महानगरपालिका इमारतींची दुरुस्ती करणेबाबत.

विषय क्र.२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५६४ विषय क्रमांक - ०३
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – स्थापत्य क/ह मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/३९९/२०१८ दि.१९/१०/२०१८

विषय - प्रभाग क्र.८ सेक्टर नं.१ हॉटेल हवेली मागील परिसरात व इत्यादी ठिकाणी फुटपाथ करुन कलर पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५६५ विषय क्रमांक - ०४

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/४५८/२०१८ दि.२३/१०/२०१८

विषय - प्र.क्र.१९ वाल्हेकरवाडी मधील विविध ठिकाणी देखभाल दुरुस्ती सुधारणा व स्थापत्य विषयक कामे करणेकामी.

विषय क्र.४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५६६ विषय क्रमांक - ०५

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – फ क्षेत्रीय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.फक्षेका/आ-२/कावि/७९३/२०१८ दि.२३/१०/२०१८

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका फ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागामार्फत क्षेत्रीय कार्यालय स्तरावर तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणुन घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतुक करणेकामी (Primary & Secondary waste collection) मे. एस.टी.मोटर्स यांना दि.०१/०५/२०१८ ते दि.३१/१२/२०१८ पर्यंत मुदतवाढीचे प्रति मे.टन र.रु.९११/- वर ५% दरवाढ प्रति मे.टन र.रु.९५६.५५ प्रमाणे प्रत्यक्ष खर्च अंदाजे र.रु.३१,००,०००/- होणार असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५६७ विषय क्रमांक - ०६

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/८/३१९/२०१८ दि.२५/१०/२०१८

विषय - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजुर व पिंपरी चिंचवड महानगरपालिका नियोजन नियंत्रणाखाली समाविष्ट झालेल्या मंजुर विकास योजनेतील क्षेत्र भुसंपादनाने ताब्यात घेणेबाबत.

विषय क्र.६ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५६८ विषय क्रमांक - ०७
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/३०३/२०१८ दि.२५/१०/२०१८

विषय - पी.एम.पी.एम.एल चे बसेसमधून दर महिन्यातून १ दिवस मोफत प्रवासाबाबत व त्यापोटी येणारा तूटीचा अर्थिकभार महानगरपालिकेमार्फत उचलणेबाबत.

विषय क्र.७ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५६९ विषय क्रमांक - ०८
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – क्रीडा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/३०९/२०१८ दि.०६/१०/२०१८

विषय - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.५६ दि.२६/१०/२०१८ बाबत.

विषय क्र.८ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५७० विषय क्रमांक - ०९
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/४९४/२०१८ दि.२६/१०/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.27/74/2018-19 अन्वये प्रभाग क्र.८ सेक्टर नं.११ व १३ इत्यादी ठिकाणी रस्ते हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.बी.के.खोसे नि.र.रू.37,63,192/- (अक्षरी र.रु.सदोतीस लाख त्रेसष्ठ हजार एकशे ब्याण्णव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.36,79,436/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.36,79,436/- पेक्षा 16.11% कमी म्हणजेच र.रु.30,86,679/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.14,841/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.68,915/- = एकुण र.रु.31,70,435/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम

लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५७१ | विषय क्रमांक - १०

दिनांक – ०५/११/२०१८ | विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/१७५७/२०१८ दि.२९/१०/२०१८

विषय - ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.२३ थेरगाव मध्ये ड्रेनेज लाईन व चेंबर्सची देखभाल दुरुस्ती व इतर आकस्मितपणे उद्भवणारी जलनिःसारण विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.८ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५७२ | विषय क्रमांक - ११

दिनांक – ०५/११/२०१८ | विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१६२/२०१८ दि.२९/१०/२०१८

विषय - प्रभाग क्र.४ दिघी- बोपखेल येथील विविध ठिकाणचे चरांची व डांबरी रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत.

विषय क्र.११ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५७३ | विषय क्रमांक - १२

दिनांक – ०५/११/२०१८ | विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१६१/२०१८ दि.२९/१०/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.37/5/2018-19 अन्वये प्रभाग क्र.४ दिघी मध्ये ठिकठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी मे.सागर कन्स्ट्रक्शन नि.र.रू.41,76,298/- (अक्षरी

र.रू.एक्केचाळीस लाख शहात्तर हजार दोनशे अठ्ठयाण्णो फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.40,74,241/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.40,74,241/- पेक्षा 12.60% कमी म्हणजेच र.रु.35,60,887/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.69,257/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.32,800/- = एकुण र.रु.36,62,944/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५७४ विषय क्रमांक - १३

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१६०/२०१८ दि.२९/१०/२०१८

विषय – प्रभाग क्र.६ मोशी योथील भाजी मंडईचा विस्तार करणेबाबत.

अ.क्र.१३ कामीचा विषय मागील सभेमध्ये ऐनवेळचा मंजुर करणेत आला असल्याने सदरचा विषय मागे घेणेस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५७५ विषय क्रमांक - १४

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे पत्र क्र.मभा/१५/कावि/१०३/२०१८ दि.३०/१०/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभाग यांचेसाठी क्वायर मॅट्रेसेस गाद्या खरेदीसाठी इ निविदा सुचना क्र.११/२०१७-१८ नुसार मे.स्टार फॅब्रिक्स, निगडी पुणे ४४ यांचे रु.रू.५,८४,०४५/- हे लघुत्तम दर प्राप्त झालेले असुन सदरचे दर स्विकृत करणेत आलेले आहेत. त्यानुसार मे.स्टार फॅब्रिक्स यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आलेला असून पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने र.रु.५,८४,०४५/- (अक्षरी र.रू.पाच लाख चौ-याऐंशी हजार पंचेचाळीस फक्त) खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -३५७६
विषय क्रमांक - १५
दिनांक – ०५/११/२०१८
विभाग – क क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.साधना मळेकर
अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेका/स्था/कावि/१०७/२०१८ दि.३०/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

क क्षेत्रीय कार्यालय मुख्यालयाचे प्रस्तावात नमूद कामांचा दि.२७/०९/२०१८ च्या मा.महापालिका सभेमध्ये उपसुचना ठराव क्र.२७६ अन्वये एकूण रक्कम रूपये ५.४० कोटी अखर्चीत निधीमधून वर्ग करणेबाबतचा ठराव करणेत आलेला आहे. सदरच्या कामांची निविदा प्रक्रिया करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या कामाच्या पुढे तरतुदी प्रमाणे वाढ करणेकामी मा.महापालिका सभा ठराव क्र.२७६, दि.२७/०९/२०१८ अन्वये वर्गीकरण करणेस मान्यता देणेत आलेली असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५७७
विषय क्रमांक - १६
दिनांक – ०५/११/२०१८
विभाग – स्थापत्य BRTS
सूचक – मा.विकास डोळस
अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/BRTS/६२१/२०१८ दि.३०/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहरातील अस्तित्वातील व नियोजीत १८.०० मी., २४.०० मी, ३०.०० मी, ४५.०० मी, व ६०.०० मी रुंद रस्ते परिपुर्ण विकसित करणेच्या अभियाना अंतर्गत तज्ञ सल्लागारांच्या नेमणुकीबाबत जाहिर प्रकटन देशातील व राज्यातील वृत्तपत्रात प्रसिध्द करुन प्राप्त प्रस्तावांपैकी पात्रता व अर्हता प्राप्त सल्लागारांची मनपाचे रस्ते परिपुर्ण विकसित करणेच्या अभियानाच्या पॅनलवर प्रस्तावात नमूद प्रमाणे नेमणुक करण्यात आलेली असुन पॅनलवर नेमणुक झालेले सल्लागार व त्यांचे कडून निविदेद्वारे प्राप्त कि.मी.रस्त्याचे रुंदीप्रमाणे येणा-या सल्लागार फी खर्चास प्रस्तावात नमूद प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५७८ विषय क्रमांक - १७
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/कावि/५६/२०१८ दि.२९/१०/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग अ मुख्यालयाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते १७) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५७९ विषय क्रमांक - १८
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ –मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/५००/२०१८ दि.३०/१०/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग क मुख्यालयाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ३) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५८० विषय क्रमांक - १९
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – स्थापत्य ह मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ –मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/४९९/२०१८ दि.३०/१०/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग ह मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (१ ते ४) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५८१ विषय क्रमांक - २०
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/२३८/२०१८ दि.२०/१०/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते २) मधील निविदा कामांचे अवलोकनहोवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देयअसल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्येझालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५८२ विषय क्रमांक - २१
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – ग क्षेत्रीय स्थापत्य
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.गक्षेका/०१/कावि/१६/२०१८ दि.२६/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या ग क्षेत्रिय कार्यालयाचे स्थापत्य विभागाकरीता अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरील तरतुद माहे ऑक्टोबर २०१८ ते माहे फेब्रुवारी २०१८ या महिन्यांकरीता अस्थायी अस्थापनेवरील कर्मचारी यांचे वेतन अदायगी करीता तरतुद कमी पडत असल्याने र.रु.१,००,०००/- तरतुद वाढवुन देणेकामी टायर ट्यूब खरेदी या लेखाशिर्षातील एकुण र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख फक्त) इतकी रक्कम अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षामध्ये वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५८३ विषय क्रमांक - २२
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – ग क्षेत्रीय प्रशासन
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.गक्षेका/०१/कावि/८२८/२०१८ दि.१६/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या ग क्षेत्रिय कार्यालयाचे प्रशासन विभागाकरीता अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरील तरतुद माहे सप्टेंबर २०१८ ते माहे फेब्रुवारी २०१८ या महिन्यांकरीता अस्थायी अस्थापनेवरील कर्मचारी यांचे वेतन अदायगी करीता तरतुद कमी पडत असल्याने र.रु.१,००,०००/- तरतुद वाढवुन देणेकामी मा.अध्यक्ष, ग प्रभाग समिती यांना खाजगी वाहन वापराबाबतचा खर्च अनुज्ञेय करणेत आलेला असलेने “मा.प्रभाग अध्यक्ष वाहन इंधन” या लेखाशिर्षातील एकुण र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख फक्त) इतकी रक्कम अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षामध्ये वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५८४ विषय क्रमांक - २३
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – मध्य.साहित्य भांडार, वैद्य.
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभा/५/कावि/४६८/२०१८ दि.३०/१०/२०१८

विषय – पिंपरीनगर येथील डिझेल शवदाहिनी चालविणे, निगा देखभाल व दुरूस्ती करणेबाबत.

विषय क्र.२३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५८५ विषय क्रमांक - २४
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ –मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/११/कावि/१०९८/२०१८ दि.३१/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिचंवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामध्ये डॉ.अविनाश वाचासुंदर कार्यकारी विश्वस्त, (Managin Trustee), मोरया मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, चिचंवड हे

मानसेवी कान-नाक-घसा तज्ञ म्हणून सेवा करत आहेत. कर्णबधीर मुलांकरीता बोलता येण्यासाठी त्यांनी आश्विन मेडीकल फौंडेशन, चिचंवड या संस्थेमार्फत या रुग्णालयामध्ये दि.१८/९/२०११ पासुन स्पिच थेरपी सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. सदर सुविधाची मुदत दि.२३/०९/२०१८ पर्यंत वाढविण्यास व त्यानुसार संबंधीत प्रशिक्षण देणा-या दोन शिक्षकांना प्रत्येकी दर महा र.रु.६०००/- प्रती माह या प्रमाणे दि.२४/०९/२०१७ ते २३/०९/२०१८ पर्यंतचे एक वर्षाचे मानधन रक्कम अदा करणेस मा. स्थायी समितीने ठराव क्र.३१८८ दि.१८/९/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर संस्थेने ही सुविधा पुढे सुरु ठेवणे बाबत दि.१२/१०/२०१८ च्या पत्रान्वये विनंती केलेली आहे. तसेच सदरची बाब ही सामाजिक दायीत्व आहे. जन्मजात कर्णबधीर मुलांकरीता बोलता येण्यासाठी सदर संस्थेकडील प्रशिक्षकांकडुन देण्यात येणा-या सुविधाचा फायदा कर्णबधीर मुलांना होत आहे. ही सुविधा स.९०० ते दु.१.०० वाजेपर्यंत दर आठवड्यात पाच दिवस देण्यात येत आहे तसेच सदर संस्थेचे कामकाज समाधानकारक असल्याने व सदर स्पिच थेरपी सुविधा पुढे सुरु ठेवणे करीता आश्विन मेडीकल फौंडेशन,चिचंवड या संस्थेच्या प्रशिक्षकांची एक दिवस सेवा खंडीत करून दि.२५/९/२०१८ ते २४/०९/२०१९ या कालावधीस मुदतवाढ देणेस व त्यानुसार दोन प्रशिक्षकांना अर्धवेळ काम केल्याबद्दल दरमहा प्रत्येकी र.रू.६,०००/- (अक्षरी र.रू.सहा हजार फक्त) असे एकूण र.रू.१२,०००/- (अक्षरी र.रू.बारा हजार फक्त) सदर संस्थेस मानधन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५८६ विषय क्रमांक - २५

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/१७९२/२०१८ दि.३१/१०/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/55/2018-19 अन्वये चिंचवड मैलाशुद्दीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र.१९ मधील आनंदनगर परिसरात इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार जलनिःसारण नलिका टाकणे व जलनिःसारण विषयक सुधारणा कामे करणेकामी मे.रवि एंटरप्रायजेस नि.र.रू.44,99,954/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख नव्याण्णव हजार नऊशे चोपन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,99,912/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,99,912/- पेक्षा 17.91% कमी म्हणजेच र.रु.36,93,978/- +रॉयल्टी चार्जेस र.रु. 42/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.36,94,020/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील

निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५८७ विषय क्रमांक - २६

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/१७९०/२०१८ दि.३१/१०/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/132/2018-19 अन्वये वॉर्ड क्र.२५, पुनावळे, ताथवडे भागातील डी.पी.रस्ते व इतर परिसरात जलनि:सारण नलिकांची कामे करणेकामी मे रवि एंटरप्रायजेस नि.र.रू.37,49,983/- (अक्षरी र.रु.सदोतीस लाख एकोणपन्नास हजार नऊशे त्र्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,49,771/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,49,771/- पेक्षा 19.08% कमी म्हणजेच र.रु.30,34,315/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.212/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.30,34,527/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५८८ विषय क्रमांक - २७

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/१७९१/२०१८ दि.३१/१०/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/41/2018-19 अन्वये प्रभाग क्र.३० मधील सिध्दार्थनगर, गुलाबनगर, जयभीमनगर , महात्मा फुलेनगर झोपडपट्टी परिसरात आवश्यक

त्या ठिकाणी जलनि:सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकामी मे रवि एंटरप्रायजेस नि.र.रू.29,99,983/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख नव्याण्णव हजार नऊशे त्र्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,99,983/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,99,983/- पेक्षा 21.06% कमी म्हणजेच र.रु.23,68,187/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.23,68,187/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५८९ विषय क्रमांक - २८

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/१७८९/२०१८ दि.३१/१०/२०१८

विषय - च-होली मैलाशुध्दिकरण केंद्रातर्गत प्रभाग क्र.१ चिखली व शेलारवास्ती, सोनावणेवस्ती परीसरात आवश्यकतेनुसार भुयारी गटर नलिका टाकणेबाबत.

विषय क्र.२८ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५९० विषय क्रमांक - २९

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/६/कावि/१६९/२०१८ दि.३०/१०/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१५.१०.२०१८ ते दि.२१.१०.२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१६९/२०१८ दि.३०/१०/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -३५९१ विषय क्रमांक - ३०

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – ब क्षेत्रीय, आरोग्य

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचे पत्र क्र.बक्षेआ/५/कावि/६६७/२०१८ दि.३१/१०/२०१८

विषय - निविदा नोटीस क्र.३/२०१५-१६ नुसार अतिरिक्त १ वाहानांसाठीच्या येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.३० चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५९२ विषय क्रमांक - ३१

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/२३/कावि/१२६९७/२०१८ दि.३०/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन २०१८-२०१९ च्या मुळ अंदाजपत्रकात भाग-३ मध्ये मुख्यमंत्री सहायत्ता निधी या लेखाशिर्षावर र.रु.१,००,००,०००/- तरतूद करण्यात आलेली आहे. या आर्थिक वर्षात केरळ पुरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहायता निधी या लेखाशिर्षावर भाग-३ मध्ये मनपा अधिकारी/ कर्मचा-यांचे वेतनातून १ दिवसाचा पगार कपात करणेत आलेला आहे. व ती र.रु.१,०४,०१,०१२/- इतकी आहे. आजतागायत मुख्यमंत्री सहायत्ता निधी र.रु.९५,०४,२४६/- अदा करणेत आलेले आहेत. र.रु.८,९६,७६६/- अदा करणे बाकी सदर रक्कम अदा करणेस तरतूद अपूर्ण आहे. व सदर रक्कम अदायगीकामी भाग–३ अंदाजपत्रकात जमा/खर्चात वाढ करणे आवश्यक आहे. लेखा विभागा मार्फत सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात मुख्यमंत्री सहायत्ता निधीस तरतूदी करण्यात आलेली होती. परंतु केरळ पुरग्रस्त नैसर्गिक आपत्तीमुळे जमा होणा-या रक्कमेपेक्षा सदर तरतूद र.रु.५,००,०००/- कमी पडत आहे. तरी सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात भाग -३ मध्ये जमा व खर्चास र.रु ५,००,०००/- वाढ करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतुद क्र.२(१) नुसार वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५९३ विषय क्रमांक - ३२
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – अ क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.अक्षे/कावि/६/१०३/२०१८ दि.२९/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्रं.१९ मध्ये प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाचे नुतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर प्रेक्षागृहाचे अंतर्गत भीतींवर नाटक, लोककला, गायन इत्यादी क्षेत्रातील चित्रे लावुन नाट्यगृहाचे शोभा वाढविणे शक्य आहे. सदर विषयी दि.२२।१०।२०१८ रोजी मा.आयुक्त व संबधित अधिकारी यांचे समवेत सुप्रसिध्द चित्रकार सुनिल शेगांवकर व प्रवीण गांगुर्डे यांची एकत्रित चर्चा झाली आहे. सदर चर्चेनंतर संबधित चित्रकार यांनी त्यांची चित्रे मा. आयुक्त सो. व संबधित अधिकारी यांना दाखविली आहेत. सदरची चित्रे अत्यंत उत्कृष्ठ दर्जाची आहेत. सदर प्रकरणी मा.आयुक्त व संबधित अधिकारी यांनी सुचविलेल्या विषयावर चित्रकार सुनिल शेगांवकर यांचेकडुन एकुण ४ चित्रे, साईज- ८ फुट x ५ फुट (चित्राचे फ्रेमसह) साठी दरपत्रक घेऊन पुढील आवश्यक कार्यवाही करणेबाबत ठरले होते. तरी त्यांस अनुसरून सुनिल शेगांवकर, चित्रकार यांनी दरपत्रक दिले असुन ८ फुट X५ फुट साईजचे चित्रासाठी (चित्राचे फ्रेमसह) र.रू.२,५०,०००/- प्रति नग जी.एस.टी. व इतर कराशिवाय खर्च येईल असे त्यांनी कळविले आहे. त्यानुसार एकुण ४ चित्रांसाठी फ्रेमसह र.रू.१०,००,०००/- इतका खर्च जी.एस.टी. व इतर कराशिवाय येईल. सदरचा खर्च "विशेष योजना"या लेखाशिर्षाअंतर्गत "प्र.क्रं.२४ (रामकृष्ण मोरे प्रक्षागृह) मधील रामकृष्ण मोरे नाट्यगृहाचे नुतनीकरण करणे" (पान क्रं.४६, अ.क्रं.१६/१) या कामातुन करणे शक्य आहे. सुनिल शेगांवकर, चित्रकार यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभागृहासाठी स्व. बाळासाहेब ठाकरे व स्वांतत्रवीर सावरकर यांच्या चित्रकृती यापुर्वी केलेल्या आहेत. तसेच त्यांचा चित्रांच्या क्षेत्रात २५ वर्षापासुन हातखंडा असल्यामुळे प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात ४ चित्रे काढणेसाठी काम थेट पध्दतीने करणेची तयारी दर्शविली आहे. तरी वरील बाबींचा विचार करता सदरचे काम विशेष स्वरूपाचे असलेने त्यांचा या क्षेत्रातील अनुभव विचारात घेता प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात ४ चित्रे (चित्राचे फ्रेमसह) काढणेसाठी करारनामा करून थेट पध्दतीने काम देऊन करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ मधील अनुसूचीतील प्रकरण ५ नियम २(२) चे परंतुकेनुसार मान्यता देणत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५९४ विषय क्रमांक - ३३
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – अ क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.अक्षे/कावि/६/१०२/२०१८ दि.२९/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्रं.१९ मध्ये प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाचे नुतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर प्रेक्षागृहाचे सीमाभिंतवर अंतर्गत भागात ग्राफिकल पेटींग म्युरल काढुन नाट्यगृहाचे शोभा वाढविणे शक्य आहे. सदर विषयी दि.२२|१०|२०१८ रोजी मा.आयुक्त व संबधित अधिकारी यांचे समवेत सुप्रसिध्द चित्रकार सुनिल शेगांवकर व प्रवीण गांगुर्डे यांची एकत्रित चर्चा झाली आहे. सदर प्रकरणी मा. आयुक्त व संबधित अधिकारी यांनी सुचविलेल्या विषयावर चित्रकार प्रविण गांगुर्डे यांचेकडुन दर्शनी भागाच्या सीमाभिंतीच्या अंतर्गत भागात ग्राफिकल पेटींग म्युरल करणेकामी दरपत्रक घेऊन पुढील आवश्यक कार्यवाही करणेबाबतच्या सूचना मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या आहेत. तरी त्यांस अनुसरून प्रविण गांगुर्डे, चित्रकार यांनी दरपत्रक दिले असुन पेटींग म्युरल रंगविणे साठी र.रू.६००/- प्रति चौ.फुट जी.एस. टी. व इतर कराशिवाय खर्च येईल असे त्यांनी कळविले आहे. त्यानुसार प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असता सुमारे ६० मी X २ मी इतका सीमाभितींचा पृष्ठभागावर काम करणे शक्य आहे. त्यानुसार १२० चौ.मी. म्हणजेच सुमारे १२९१ चौ.फुट साठी र.रू.७,७४,६००/- इतका खर्च जी.एस.टी. व इतर कराशिवाय येईल. सदरचा खर्च "विशेष योजना"या लेखाशिर्षाअंतर्गत "प्र.क्रं.२४ (रामकृष्ण मोरे प्रक्षागृह) मधील रामकृष्ण मोरे नाट्यगृहाचे नुतनीकरण करणे" (पान क्रं.४६, अ.क्रं.१६/१) या कामातुन करणे शक्य आहे. प्रविण गांगुर्डे, चित्रकार हे या क्षेत्रात २७ वर्षापासुन कार्यरत आहे. प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाचे सीमाभिंतीवर ग्राफिकल पेटींग म्युरलचे काम पाच वर्षे टिकेल व त्यावर लॅंकर कोटींग करणेत येईल असे कळविले आहे. तसेच सदर काम करणेसाठी थेट पध्दतीने करणेची तयारी दर्शविली आहे तरी वरील बाबींचा विचार करता सदरचे काम विशेष स्वरूपाचे असलेने त्यांचा या क्षेत्रातील अनुभव विचारात घेता प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात ४ चित्रे (चित्राचे फ्रेमसह) काढणेसाठी करारनामा करून थेट पध्दतीने काम देऊन करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ मधील अनुसूचीतील प्रकरण ५ नियम २(२) चे परंतुकेनुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५९५ विषय क्रमांक - ३४
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – मध्य.साहित्य भांडार, वैद्य.
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/४७०/२०१८ दि.०१/११/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे भोसरी, जिजामाता, थेरगांव, आकुर्डी व अजमेरा या रुग्णालयाच्या ठिकाणी मेडीकल गॅसचे काम करण्याकरीता महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक-खाक्षेस-२०१५/प्र.क्र.२०९/रस्ते-९अ, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक २४/०१/२०१७ चे शासन निर्णयास अधिन राहून परिशिष्ट-अ मध्ये सल्लागारांची वर्गवारी करताना मोठे प्रकल्प-१० कोटी पेक्षा जास्त किंमतीचे, मध्यम प्रकल्प-५ ते १० कोटी किंमतीचे व छोटे प्रकल्प-५ कोटी पेक्षा कमी किंमतीचे म्हणजेच मोठे प्रकल्प-१.५%, मध्यम प्रकल्प-२.०% व छोटे प्रकल्प-२.५% प्रमाणे M/s.Shashi Prabhu & Associates यांना तज्ञ सल्लागार नेमणेकरीता व प्रकल्पाच्या वर्गवारीप्रमाणे सल्लागार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५९६ विषय क्रमांक - ३५
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – वैद्यकिय, धन्वंतरी
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१४अ/कावि/६९५/२०१८ दि.०१/११/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचा वाढता खर्चाचा आढावा घेऊन मनपा आस्थापनेवरील व शिक्षण मंडळातील शिक्षकांना वैद्यकीय विमा योजना लागू करणेकामी मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार माहे मार्च २०१८ मध्ये मध्यस्थ नेमणूकीकरीता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास अनुसरुन ४ निविदाधारकांनी या प्रक्रियेमध्ये सहभाग घेऊन त्यांनी विहित मुदतीत सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने मे.क्रिसील यांनी पडताळणी करुन ४ निविदाधारकांचे गुणांकन केलेले आहे. त्यानुसार मे.के.एम.दस्तुर प्रा.लि. यांना सर्वात जास्त गुणांक प्राप्त झालेले आहेत. तरी मे.के.एम.दस्तुर ब्रोकर्स प्रा.लि. यांना कर्मचारी/अधिकारी यांचेसाठी वैद्यकीय विमा योजना लागू करणेकामी मे.के.एम.दस्तुर यांची मध्यस्थ म्हणून नेमणूकीस मान्यता देणेत आलेली आहे. मध्यस्थ म्हणून नेमणूक झाल्यावर के.एम.दस्तुर इन्शुरंन्स ब्रोकर प्रा.लि. यांना IRDA च्या नियमानुसार कोणत्याही प्रकारचा मोबदला देय राहणार नसल्याने यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -३५९७ विषय क्रमांक - ३६

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – नगरसचिव

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.नगरसचिव यांचे पत्र क्र.नस/१/कावि/१२२१/२०१८ दि.०१/११/२०१८

मा.नगरसचिव यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३५९८ विषय क्रमांक - ३७

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – स्थापत्य ड/ग मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/४४१/२०१८ दि.०१/११/२०१८

विषय – नविन प्रभाग क्र.२७ येथील रहाटणी येथील नखाते नगर रहाटणी फाटा व प्रभागातील व परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत.

विषय क्र.३७ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -३५९९ विषय क्रमांक - ३८

दिनांक – ०५/११/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भोसरी करसंकलन विभागातील कार्यरत प्र.प्रशासन अधिकारी श्री.अमर राजाराम तेजवाणी हे दिनांक ३१/१०/२०१८ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून त्यांचा कामकाजाचा अनुभव व मिळकतधारकांशी उत्तम वागणूक विचारात घेता त्यांना सेवानिवृत्तीनंतर हंगामी ६ महिने मुदतीकरिता नियमानुसार एकत्रित मानधनावर कार्यालय अधिक्षक या पदावर नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ३६००　　　　　　　　विषय क्रमांक - ३९
दिनांक – ०५/११/२०१८
सूचक – मा.विलास मडिगेरी　　　　　　　　अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

आदिवासी सांस्कृतिक महोत्सवा बरोबर ड प्रभाग कार्यक्षेत्रातील पिंपळेगुरव या ठिकाणी आदिवासी महिलांचे बचत गटांसाठी आदिवासी खाद्य महोत्सवाचे आयोजन करणेस त्यासाठी सर्व अंमलबजावणी कार्यकारी अभियंता, ड प्रभाग सांस्कृतिक विभाग यांचेमार्फत करणेस यासाठी लागणारी खर्चाची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील मागासवर्गीय कल्याणकारी योजना अंतर्गत इतर योजना/कार्यक्रम या उपलेखाशिर्षातून उपलब्ध करुन देणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६०१　　　　　　　　विषय क्रमांक - ४०
दिनांक – ०५/११/२०१८
सूचक – मा.सागर आंगोळकर　　　　　　　　अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा. साधना मळेकर यांचा प्रस्ताव

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३४४६, दिनांक ३०/१०/२०१८ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील कॅन्टीन जोशी बंधू केटरर्स, चिंचवड यांचे ऐवजी युनिक केटरर्स, चिंचवड संस्थेला उपसंचालक, नगररचना ठरवतील त्या भाडेदराने ११ महिने कालावधीसाठी भाडेकराराने देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६०२　　　　　　　　विषय क्रमांक - ४१
दिनांक – ०५/११/२०१८　　　　　　　　विभाग – ब क्षेत्रिय आरोग्य
सूचक – मा.अर्चना बारणे　　　　　　　　अनुमोदक – मा.करुणा चिंचवडे
संदर्भ – मा.अति. आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.बक्षेआ/५/कावि/६७४/२०१८, दि.०३/११/२०१८

मा.अति. आयुक्त (२) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील म.न.पा.चे आरोग्य विभागाकडील सार्वजनिक शौचालयाचे व मुता-यांची यांत्रिकी पद्धतीने (पाण्याचे उच्चदाब

फवा-याच्या सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई, देखभाल व किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती करणे या कामासाठी शौचालय वमुता-या एकुण ४९२ सिट्स करीता अंदाजपत्रक तयार करुन निविदा नोटीस क्र.३/२०१८-१९ र.रु.६८,९१,२६४/- प्रमाणे प्रति माह येणारा खर्च र.रु.२,६१,०३३/- च्या १०% सेवा शुल्क र.रु.२६,१०३/- रकमेवर दर मागविणेसाठी निविदा प्रसिध्द करणेत आली होती. एकुण पात्र ११ निविदाधारकांपैकी ६ निविदा धारकांनी प्रति माह येणारा खर्च र.रु.२,६१,०३३/- च्या १०% सेवा शुल्क र.रु.२६,१०३/- रकमेवर -१००% हा नवीन समान लघुत्तम दर सादर केला होता. मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार निविदा धारकांसमोर (ड्रॉ) लॉटरी पद्धतीने सोडत केली असता मे.श्री.संत साई स्वयंरोजगार सेवा संस्था या निविदाधारकांस नियुक्त करण्यात आले. मे.श्री.संत साई स्वयंरोजगार सेवा संस्था यांचा प्रति माह येणाराखर्च र.रु.२,६१,०३३/- च्या १०% सेवा शुल्क र.रु.२६,१०३/- रकमेवर -१००% हादर स्वीकृत करणेस मान्यता देणेत आली असुन स्विकृत दरानुसार २४ महीनेकालावधीकरीता येणा-या अंदाजे र.रु.६२,६४,७९२/- अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास व याकामी मे. श्री.संत साई स्वयंरोजगार सेवा संस्थायांची ठेकेदार म्हणुन नियुक्ती करणेस त्यांचेशी करारनामा करणेस व आदेश देणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६०३ विषय क्रमांक - ४२

दिनांक – ०५/११/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.,पुणे जिल्हा कबड्डी असो.यांचे मान्यतेने दि.२२/११/२०१८ ते २५/११/२०१८ या काळात प्रभाग क्र.११, शनिमंदिर मैदान, जुने आर.टी.ओ. ऑफिसच्या पाठीमागे, पुर्णानगर, चिखलीपुणे येथे महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१८ आयोजित करण्यात येत आहे. सदरस्पर्धाअनुषंगानेप्रस्तावात नमूद केले प्रमाणे खर्च अपेक्षित असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.,पुणे जिल्हा कबड्डी असो.यांचे मान्यतेने दि.२२/११/२०१८ ते २५/११/२०१८ या काळात प्रभाग क्र.११, शनि मंदिर मैदान, जुने आर. टि. ओ. ऑफिसच्या पाठीमागे, पुर्णानगर, चिखली,पुणे येथे महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्च र.रू.२६,५०,८६०/-चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता तसेच मैदान तयार करणे, स्टेज, टेबल,खुर्च्या व्यवस्था, गॅलरी खर्च,खेळाडू निवास व्यवस्था ठिकाणी गाद्या, उशा, बादली, मग पुरविणे खर्च इ.हा स्थापत्य विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय वस्पर्धा ठिकाणी विद्युत, स्पिकर व माईक व्यवस्था खर्च व महिला व पुरुष खेळाडू निवास व्यवस्था ठिकाणी लाईट

व्यवस्था करणे, स्टँड फॅन इ. व्यवस्था खर्च हा विद्युत विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.२६,५०,८६०/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६०४ विषय क्रमांक - ४३
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग –विद्युत मुख्यालय
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.करुणा चिंचवडे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता(वि/या) यांचेकडील पत्र क्र.विमुका/५/कावि/५४५/२०१८, दि.०५/११/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.10/13/2018-19 अन्वये प्रभाग क्र.२६ येथील महादेव मंदीर ते बाणेर पुल तसेच त्याला लागुन पिंपळेनिलख स्मशानभुमीपर्यंतचा १८ मी डी.पी रस्ता विकसीत करणेकरीता विद्युतविषयक कामे करणेकामी मे.मनुश्री इलेक्ट्रीक्स नि.र.रू.38,90,539/- (अक्षरी र.रू.अडोतीस लाख नव्वद हजार पाचशे एकोण चाळीस फक्त) पेक्षा 20.1% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.31,08,541/- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार वनिविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६०५ विषय क्रमांक - ४४
दिनांक - ०५/११/२०१८ विभाग – आकाश चिन्ह व परवाना
सूचक - मा.सागर आंगोळकर अनुमोदक - मा.विकास डोळस
संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.आप/७/कावि/१५७/२०१८, दि.०३/११/२०१८

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत सध्या जाहिरात फलक होर्डीग्जकाढणेची कारवाई मोठ्या प्रमाणात चालु आहे. तथापि कामकाजाचा आढावा घेतलाअसता अंदाजे ३०० होर्डिग्ज काढणेची कारवाई चालु आहे. त्यानुसार ३०० होर्डीग्ज काढणेकामी खर्च मोठ्या प्रमाणात येणार आहे. त्यापैकी निविदारकमेच्या मर्यादेत तुर्त र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त)

इतका वाढीव खर्च मंजुर करणे व चालु आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकात सदर लेखाशिर्षावर रक्कम शिल्लक असल्याने या कामाकरीता वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत मा. अति.आयुक्त(२) यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत अनाधिकृत फलक काढणेकामी ई निविदा सुचना क्र.१/२०१७-१८ नुसार दर प्राप्त करुन मे.गणेश एंटरप्रायजेस यांना कामाचा आदेश दिलेला आहे. सदरचा कामकाज आदेश हा दोन वर्षासाठी दिलेला आहे. सदरची निविदा र.रु.१,००,००,०००/- इतक्या रकमेची आहे. परंतु अनाधिकृत फलक जादा असलेने वाढीव खर्च र.रु.५०,००,०००/- करीता विषय आलेला आहे. दि.०१/०६/२०१८ रोजी आलेल्या मुसळधार पावसाने पिंपरी चिंचवड शहरामधील जाहिरात फलक कोसळले त्यामध्ये दोन लोकांचे जिव गेले आहेत. तसेच पुणे म.न.पा. हद्दीत नजिकचे कालावधीमध्ये जाहिरात फलक पडुन चार लोकांचे जीव गेले आहेत. अशा घटना पिंपरी चिंचवड शहरामध्ये घडु नये त्यासाठी दक्षता घेणेबाबत तसेच जाहिरात फलक/ होर्डीग्ज् ची पाहणी करुन कुमकुवत झालेल्या फलकाचे सांगाडे जाहिरात सुरक्षितरित्या काढणेकरीता विविध सामाजिक संघटना, नगरसदस्य, पदाधिकारी, पोलीस अधिकारी यांनी कारवाई करणेबाबत कळविलेले आहे. तसेच उच्च न्यायालयामधील PIL-155 अन्वये उच्च न्यायालयाने शहरातील अनाधिकृत फलक/होर्डीग्ज् त्वरीत काढणेबाबत निर्देश दिलेले आहेत. शहराचे विद्रुपीकरण होऊ नये तसेच वादळवा-याने होर्डीग्ज फलक पडुन कोणतीही दुर्घटना तथा जिवितहाणी होऊ नये असा मानवतावादी दृष्टीकोन ठेऊन व शहरामध्ये साधारणत: ३०० अनाधिकृत होर्डिग्ज् फलक असलेने या सर्व गोष्टीचा विचार करता सदर विषयास र.रु.५०,००,०००/- वाढीव खर्चा ऐवजी र.रु.२ कोटी ५० लाख इतकी वाढीव तरतुद करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६०६ विषय क्रमांक - ४५
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – ब क्षेत्रिय पाणीपुरवठा
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/बक्षेका/२/कावि/५६/१८, दि.०१/११/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

ब मुख्यालय अंतर्गत सन २०१६-१७ साठी जलक्षेत्र क्र.बी/२ ते बी/८ मध्ये व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी मजुर कर्मचारी पुरविणे "कामाचा आदेश ठेकेदार मे.शुभम उद्योग यांना दि.३०/१२/२०१७ रोजी देणेत आला आहे. सदर कामाची मुदत ७ महिने म्हणजेच दि.२९/०७/२०१८ पर्यंत आहे. जलक्षेत्र क्र. बी/२ ते बी/८ अंतर्गत बिजलीनगर पाण्याची टाकी,

प्रेमलोक पाण्याची टाकी, पुनावळे टाकी व परिसर, ताथवडे टाकी व परिसर तसेच एल्प्रो टाकी व परिसर इत्यादी भाग समाविष्ट आहे. सदर कामाअंतर्गत वरील पाण्याच्या टाकीवरील व परिसरातील व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी मजुर कर्मचारी पुरविणेत आले आहेत. सद्यस्थितीत जलक्षेत्र क्र.बी/२ ते बी/८ अंतर्गत व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी मजुर पुरविणे या कामा व्यतिरिक्त दुसरे कोणतेही काम या विभागाकडे उपलब्ध नाही. नवीन अंदाजपत्रक सन २०१८-१९ मध्ये उपरोक्त नमूद केलेल्या टाक्यांचा व इतर परिसरात परिचालन करणे या कामांचा समावेश करणेत आलेला आहे. परंतु सदरचे नवीन कामाचे अंदाजपत्रक तयार करताना कर्मचारी किमान वेतनाचा दर या विभागास उशिरा प्राप्त झालेला आहे. त्यामुळे उपरोक्त विषयांकित कामास मुदतवाढ घ्यावी लागणार आहे. आजच्या दिनांका पासून पुढे अंदाजपत्रक तयार करणे, निविदा कार्यवाही करणे, कामाचा आदेश प्राप्त होणे इत्यादी बाबीसाठी किमान ६ महिने लागणार आहे. सदर कामाची निविदा र.रू.६८,९८,६००/- एवढी आहे. कामांस ६ महीने एवढी मुदतवाढ घ्यावी लागणार असलेने सदर कामास सुधारीत अंदाजपत्रकीय र.रू.१,२९,००,०००/- एवढी होणार आहे. सन २०१८-१९ च्या मनपा अंदाजपत्रकात पान क्र.७०३, अनु.क्र.२१ वरती सदर कामास अंदाजपत्रकीय र.रू.९०,००,०००/- एवढी असून सन २०१८-१९ चा अंदाज र.रू.३९,४०,६००/- एवढा आहे. त्यामुळे नविन प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू कामाची मुळ निविदा र.रू.६८,९८,६००/- एवढी आहे व सदर कामास ६ महिने एवढी मुदत वाढ घ्यावयाची आहे त्यामुळे सन २०१८-१९ च्या मुळ अंदाजपत्रकात र.रू.२९,५६,५४२/- (पाचव्या आर.ए. बीलाची र.रू.९,८५,५१४/- + ६ महिने मुदतवाढसाठी बीलाची रक्कम रू.५९,१३,०८४/- असे एकूण र. रू.६८,९८,५९८/- - ६९,००,०००/-) एवढी वाढीव तरतूद करावी लागणार आहे. तसेच सदर कामांस दि.३०/०७/२०१८ पासून दि.३०/०१/२०१९ पर्यंत मुदतवाढ घ्यावी लागणार आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता सदर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रू.१,२९,००,०००/- साठी काम करणेस मान्यता देणेस आणि ६ महिने वाढीव मुदतवाढ देणेस तसेच प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढीव र.रू.६९,००,०००/- इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.
(वाढ/घट र.रू.६९,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६०७ विषय क्रमांक - ४६
दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – फ क्षेत्रिय आरोग्य
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ –मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/आ/२/कावि/८१४/२०१८, दि.०५/११/२०१८

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत औष्णिक धुरीकरण करण्यासाठी झेन फॉग व वॅन फॉगमशिन ठेवुन कामकाज करण्यासाठी आवश्यक डिझेल इंधनावर चालणारे (दोन) रिक्षा टेम्पो भाड्याने वाहन चालकासह घेणे कामाकरीता दि.०८/०१/२०१८ पासुन निविदाप्रक्रियेतंर्गत आदेश निर्गमित होईपर्यंत मुदतवाढ देणेस व प्रति दिन प्रती रिक्षा टेम्पो र.रु.५४१.५० प्रमाणे माहे डिसेंबर २०१८ अखेर पर्यंत अंदाजे अपेक्षीत खर्च र.रु.२,५०,०००/- व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६०८ विषय क्रमांक - ४७

दिनांक – ०५/११/२०१८ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/मुख्य/३०/२०१८, दि.०३/११/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे निरगुडी ग्रामपंचायतीस पाणीपुरवठा करणारी सार्वजनिक विहिर हि इंद्रायणी नदीलगत असल्याने च-होली मैलाशुध्दीकरणचे पाणी वाहुन येणारे पाणी विहिरीत झिरपत असल्याने विहिरीतील पाणी दुषीत झालेने पिण्यासाठी वापरणे अयोग्य आहे. निरगुडी गावासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून पिण्याचे पाणी मिळणेकामी मागणी केली होती. त्यानुसार महापालिका ठराव क्र.१५ दि.२०/०४/२०१७ अन्वये मनपाचे टप्पा ५ व ६ भामा आसखेड व आंद्रा प्रकल्पाचे काम पुर्ण झालेनंतर ग्रामापंचायत निरगुडी गावाचे विचार करुन सुमारे प्रतिदिनी १.०० लाख लिटर्स र.रु.९/- प्रति १००० लिटर्स या दराने देणे तसेच सध्या मनपाकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध नसल्याने त्यांना सुमारे ४०,००० लिटर्स फक्त पिण्याचे पाणी आंद्र व भामा आसखेडचे प्रकल्प पुर्ण होईपर्यंत टँकर द्वारे देणेबाबत मान्यता दिली आहे. सदर नंतर दि.२०/०७/२०१८ चे पत्रानुसार ग्रामपंचायतीने पाणी साठविण्यासाठी स्वंतत्र टाकीचे बांधकाम केले आहे व पालिकेने सदर टाकीमध्ये टँकर ने पाणीपुरवठा करणेबाबत विनंती केलेली आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे निरगुडी येथे टँकरद्वारे द्वारे पाणी पुरविण्याचे स्वंतत्र काम नसून सदर काम 'इ' प्रभागात टँकरने ठिकठिकाणी पाणीपुरवठा करणे. (निविदा क्रमांक-१७/१४-२०१७-१८) या कामामधुन निरगुडी येथे टँकरने पाणी पुरवावे लागणार आहे. तसेच निरगुडी गाव पाणी भरावयाच्या ठिकाणापासून (गवळीमाथा पंपिंग स्टेशन) सुमारे १४ कि.मी. दुर असल्याने मा. स्थायी समिती दि.९/०५/२०१८, ठराव क्र.२६४९ विषय क्र.२१ नुसार शेवाळेवाडीस पाणीपुरवठा करणे करीता मंजूर केले प्रमाणे र.रु.११००/- प्रति ट्रिप असादर द्यावा लागणार आहे. तसेच सदर कामास वाढीव र.रु. ५,९९,६३४/- खर्चास मान्यता द्यावी लागणार आहे. पुढील आदेश होईपर्यंत दररोज टँकर ट्रिप्स

टाकावयाचे असल्याने कालावधी निश्चित नाही. तथापि, तुर्तास या कामास पुढील आदेश होईपर्यंत टँकर ट्रिप्स पुरविण्यास व सदर कामामधुन निरगुडी गावास टँकर पुरविणे करिता र.रु.११००/- प्रति ट्रिप दरास मान्यता सदर कामास मुळ निविदा र.रु.१४,००,३६६/- व वाढीव र.रू.५,९९,६३४/- अशा एकूण येणा-या सुधारित र.रु.२०,००,०००/- (अक्षरी र.रु.वीस लाख फक्त) खर्चास पुढील आदेश होईपर्यंत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक- नस/३/कावि/१४३७/२०१८
दिनांक - ०५/११/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

## (क्र.स्था/नि/अ-मुख्य/कावि/५६/२०१८ दि.२९/१०/२०१८ विषय क्र.१७ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य अ मुख्यालय
क्र.स्था/नि/अ-मुख्य/५६/२०१८
दि. २९/१० /२०१८

प्रपत्र अ ( १ ते१७ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | मे.भालेराव कंन्स्ट्रशन | 25/1/2018-19 | प्रभाग क्र. १९ उद्योगनगर, कामदा सोसायटी व इतर परिसरामध्ये कॉक्रिट पेव्हींग व पेव्हींग ब्लॉक दुरुस्तीची कामे करणे. | ०८-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/३६/२०१८ | १५-१०-१८ | १४,९९,८३६ | १४,४२,५२५ | २६,९६० | ३०,३५० | २३.३३ % कमी | ११,६३,२९४ |
| २ | मे.शिवसाई एन्टरप्राईजेस | 25/2/2018-19 | प्रभाग क्र. १० विद्यानगर येथे नविन कलर पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ११-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/४४/२०१८ | १२-१०-१८ | १२,५४,९४४ | १२,०७,२९३ | १७,३०१ | ३०,३५० | ३१.५० % कमी | ८,७४,६४७ |
| ३ | मे.शिवगंगा कन्स्ट्रक्शन | 25/3/2018-19 | प्रभाग क्र. १० मध्ये स्टॉर्म वॉटर लाईन करणे व इतर अनुषंगिक कामेकरणे. | ११-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/४३/२०१८ | १९-१०-१८ | १५,०५,३५७ | १४,५९,६७७ | १५,३२९ | ३०,३५० | ३१.५० % कमी | १०,४५,५५८ |
| ४ | मे.सुनिल अणाप्पा सुर्यवंशी | 25/5/2018-19 | प्रभाग क्र. १९ मध्ये आवश्यक त्या ठिकाणी फुटपाथची कामे करणे. | ०६-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/३४/२०१८ | १५-१०-१८ | ७,५४,५१५ | ७,१४,०८० | १०,०८४ | ३०,३५० | १८.९९ % कमी | ६,१८,९१० |
| ५ | मे.एस.बी.काळे | 25/6/2018-19 | प्रभाग क्र. १९ भाटनगर, बी - ब्लॉक व इतर परिसरामध्ये कॉक्रिट पेव्हींग व पेव्हींग ब्लॉक दुरुस्तीची कामे करणे. | ११-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/४५/२०१८ | १९-१०-१८ | १४,९९,८७६ | १४,४५,३११ | २४,२१४ | ३०,३५० | २१.४५ % कमी | ११,८९,८५६ |
| ६ | मे.सूयोगराज कन्स्ट्रक्शन | 25/9/2018-19 | प्रभाग क्र. १० मोरवाडी येथे नविन कलर पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ११-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/४२/२०१८ | १९-१०-१८ | १२,५५,५४५ | १२,०८,०२७ | १७,१६७ | ३०,३५० | २५.५५ % कमी | ९,४६,८९३ |
| ७ | मे.पद्मीनी कन्स्ट्रक्शन | 25/12/2018-19 | प्रभाग क्र. १९ सुदर्शननगर, गावडे कॉलनी परिसर, श्रीधरनगर व इतर परिसरामध्ये कॉक्रिट पेव्हींग व पेव्हींग ब्लॉक दुरुस्तीची कामे करणे. | ०९-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/३५/२०१८ | १५-१०-१८ | १४,९९,४७९ | १४,४१,९६३ | २७,१६५ | ३०,३५० | २५.७० % कमी | ११,२८,८९४ |
| ८ | मे.अजवानी इफ्रा.प्रा.लि. | 15/12/2018-19 | प्रभाग क्र. १४ तुळजाईवस्ती विवेकनगर व इतर परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ०८-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/४०/२०१८ | १७-१०-१८ | २०,९०,५४० | २०,२७,९४० | ० | ६२,६०० | १२.३४ % कमी | १८,४०,२९२ |
| ९ | मे.अजवानी इफ्रा.प्रा.लि. | 15/22/2018-19 | प्रभाग क्र. १४ काळभोरनगर व इतर परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ०८-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/३८/२०१८ | १७-१०-१८ | २०,८८,५३१ | २०,२५,९३१ | ० | ६२,६०० | १२.३५ % कमी | १८,३८,३२९ |

| प्रपत्र अ ( १ ते१७ ) | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १० | मे.अजवानी इफ्रा.प्रा.लि. | 15/40/2018-19 | प्रभाग क्र. १४ मधील मोहननगर, काळभोरनगर, रामनगर परिसरातील मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ०८-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/३८/२०१८ | १७-१०-१८ | १२,५५,५३६ | ११,९२,९३६ | ० | ६२,६०० | १०.९९ % कमी | ११,२४,४३२ |
| ११ | मे.श्रीगणेश कन्स्ट्रक्शन | 15/39/2018-19 | प्रभाग क्र. १९ भाटनगर, बी ब्लॉक व इतर परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १६-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/४७/२०१८ | २३-१०-१८ | २०,७९,३८० | २०,१६,७८० | ० | ६२,६०० | ८.५० % कमी | १९,०७,९५४ |
| १२ | मे.किन्सी कन्स्ट्रशन प्रा.लि. | 15/20/2018-19 | प्रभाग क्र.१९ मधील खड्डे, ट्रेंचस आवश्यक त्या ठिकाणी हॉटमिक्स पध्दतीने भरणे. (सन २०१८-१९ साठी) | १५-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/५१/२०१८ | २५-१०-१८ | १४,९९,८०९ | १४,३७,२०९ | ० | ६२,६०० | ११.०७ % कमी | १३,४०,७१० |
| १३ | मे.किन्सी कन्स्ट्रशन प्रा.लि. | 15/32/2018-19 | प्रभाग क्र. १९ उद्योगनगर व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | १५-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/५०/२०१८ | २५-१०-१८ | २०,८२,४१५ | २०,१९,८१५ | ० | ६२,६०० | १२.०६ % कमी | १८,३८,८२५ |
| १४ | मे.किन्सी कन्स्ट्रशन प्रा.लि. | 15/30/2018-19 | प्रभाग क्र.१९ उद्योगनगर, कामदा सोसायटी व इतर परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे. | १४-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/४९/२०१८ | २५-१०-१८ | १३,४९,९८५ | १२,८७,३८५ | ० | ६२,६०० | ११.०७ % कमी | १२,०७,४७१ |
| १४ | मे.किन्सी कन्स्ट्रशन प्रा.लि. | 15/26/2018-19 | प्रभाग क्र. १९ मध्ये रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करणे. | १४-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/४८/२०१८ | २५-१०-१८ | १५,०४,८५४ | १४,४२,२५४ | ० | ६२,६०० | ११.०७ % कमी | १३,४५,१९६ |
| १५ | मे.भालेराव कंन्स्ट्रशन | 25/10/2018-19 | प्रभाग क्र. १४ आकुर्डी दत्तवाडी येथे नविन रंगीत रबर मोल्डेड पेव्हींग ब्लॉक बसविणे. | २०-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/५२/२०१८ | २५-१०-१८ | १२,५४,०९९ | १२,०४,४७८ | १९,२७० | ३०,३५० | २८.९० % कमी | ९,०६,००४ |
| १६ | मे.भालेराव कंन्स्ट्रशन | 25/4/2018-19 | प्रभाग क्र. १४ काळभोरनगर येथे नविन रंगीत रबर मोल्डेड पेव्हींग ब्लॉक बसविणे | २०-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/५३/२०१८ | २५-१०-१८ | १२,५५,२७१ | १२,०४,४२८ | २०,४९२ | ३०,३५० | ३०.०८ % कमी | ८,९२,९७८ |
| १७ | मे.भालेराव कंन्स्ट्रशन | 25/10/2018-19 | प्रभाग क्र. १४ आकुर्डी दत्तवाडी येथे नविन रंगीत रबर मोल्डेड पेव्हींग ब्लॉक बसविणे. | २०-१०-१८ | स्था/नि/अ-मुख्य/५४/२०१८ | २५-१०-१८ | १२,५४,०९९ | १२,०४,४७८ | १९,२७० | ३०,३५० | २८.९० % कमी | ९,०६,००४ |

सही/-

**कार्यकारी अभियंता**

स्थापत्य अ मुख्यालय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-१८

(क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/५००/२०१८ दि.३०/१०/२०१८ विषय क्र.१८ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य क मुख्यालय
क्र.स्था/नि/क-मुख्य/५००/२०१८
दि३०/१०/२०१८

प्रपत्र अ (१ ते ३)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करणेत येईल.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | मे.बी.पी.खोडदे अँड कं. | 27/63/2018-19 | प्रभाग क्र. २ जाधववाडी मधील मधलापेठा रस्त्याला व इतर ठिकाणी पावसाचे पाण्यासाठी RCC पाईप लाईन टाकणे | २५/१०/२०१८ | स्था/नि/क-मुख्य/१९०/२०१८ | २६/१०/२०१८ | १८,८२,७७८ | १८,१६,८०४ | ३६,३२४ | २९,६५० | २५.०० % कमी | १४,२८,५७७ |
| २ | मे.हर्ष एन्टरप्रायझेस | 27/86/2018-19 | प्रभाग क्र.९ मधील कब्रस्तान जागेच्या सिमाभिंतीची दुरुस्ती करणे. | २२/१०/२०१८ | स्था/नि/क-मुख्य/१८६/२०१८ | २४/१०/२०१८ | १८,७५,७५० | १८,५८,८६० | ४,२४० | १२,६५० | २१.९९ % कमी | १४,६६,९८७ |
| ३ | मे.हर्ष एन्टरप्रायझेस | 27/92/2018-19 | प्रभाग क्र. ९ मासुळकर कॉलनी मधील परीसरातील ठिकठिकाणी किरकोळ दुरुस्ती व देखभालीची कामे करणे. | २२/१०/२०१८ | स्था/नि/क-मुख्य/१८७/२०१८ | २४/१०/२०१८ | १३,८३,८५५ | १३,०६,३०९ | ९,०४६ | ६८,५०० | २१.९९ % कमी | १०,९६,५९८ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

(क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/४९९/२०१८ दि.३०/१०/२०१८ विषय क्र.१९ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य ह मुख्यालय
क्र.स्था/नि/क-मुख्य/४९९/२०१८
दि.३०/१०/२०१८

प्रपत्र अ (१ ते ४)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करणेत येईल.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | मे.पी.जे.मोटवानी | २७/२४/२०१८-१९ | प्रभाग क्र २० कासारवाडी येथील पार्श्वनाथ सोसायटी तापकीर चाळ पळसकर निवास पठारे चाळ दास चाळ व आजुबाजुच्या पेव्हींग विषयक व इतर अनुषंगीक कामे करणे | २०/१०/२०१८ | स्था/नि/क-मुख्य/१८०/२०१८ | २२/१०/२०१८ | २२,४६,७१९ | २२,०६,२३३ | ५,९३६ | ३४,५५० | ३१.२५ % कमी | १५,५७,२७१ |
| २ | मे.कविता एन्टरप्रायझेस | २७/२६/२०१८-१९ | प्रभाग क्र २० कासारवाडी संत ज्ञानेश्वर कॉलनी विशाल चैतन्य सोसायटी मनिमंगल सोसायटी शिल्पा हॉटेल व काची चाळ परिसरात पेव्हींग ब्लॉक विषयक कामे करणे | २०/१०/२०१८ | स्था/नि/क-मुख्य/१८१/२०१८ | २२/१०/२०१८ | २२,४९,७७६ | २२,०९,२८९ | ५,९३६ | ३४,५५० | ३१.०० % कमी | १५,६४,८९५ |
| ३ | मे.शिवम एन्टरप्रायझेस (माटा) | १७/५/२०१८-१९ | प्रभाग क्र २० येथील कासारवाडी मनपा शाळा मध्ये स्थापत्य विषयक कामे करणे | २०/१०/२०१८ | स्था/नि/क-मुख्य/१८२/२०१८ | २२/१०/२०१८ | ११,९६,६६६ | ११,२७,८५३ | १,४१३ | ६७,४०० | २३.०१ % कमी | ९,३७,१४७ |
| ४ | मे.शिव साई एन्टरप्रायझेस | २५/११०/२०१८-१९ | प्रभाग क्र.३० कासारवाडी, कासारवाडी स्मशानभूमी व इतर परिसरातील संडास ब्लॉकची दुरुस्ती करणे. | २२/१०/२०१८ | स्था/नि/क-मुख्य/१८५/२०१८ | २४/१०/२०१८ | ११,९८,१५० | ११,३३,७४३ | ११,३०७ | ५३,१०० | २७.२७ % कमी | ८,८८,९७८ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

(क्र.पापु/६/कावि/२३८/२०१८ दि.३०/१०/२०१८ विषय क्र.२० चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
पाणी पुरवठा विभाग
क्र.पापु/६/कावि/२३८/२०१८
दि.३०/१०/२०१८

प्रपत्र अ ( १ ते २ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा ओदशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | मे.समीप सर्व्हिरोस | २६/२/२०१७-१८ | फ क्षेत्रीय कार्यालायांतर्गत कृष्णानगर व इतर ठिकाणी पाण्याच्या वॉल्व ऑपरेशन करणे करीता मजुर पुरविणे | ०७/०५/१८ | पापु/६/कावि/६४/२०१८ | २१/०७/२०१८ | १९,४५,६९२/- | १३.६७ % कमी | १६,७९,७१५/- |
| २ | मे. श्रीसदगुरूकृपा कन्स्ट्रक्शन | ८/७/२०१६-१७ | अ क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील दुषित पाणी तक्रार निवारण,पाणी गळती दुरुस्ती व पाईप लाईन टाकणेकरिता खोदलेले ट्रेन्चेस बी.बी.एम. पेव्हींग ब्लॉक व क्रॉक्रीट ने दुरुस्ती करणे. | ३०/०६/२०१७ | पापु/६/कावि/६०१/२०१७ | २५/०९/२०१७ | १४,००,५५९/- | १६.००% कमी | ११,७६,४६९/- |

सह शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८